सकाळ

# ग्रामीण जीवनाशी निगडित साहित्याची निर्मिती करावी

## डॉ. पाठक : देऊर खुर्दला ग्रामलोक साहित्यिक कार्यक्रमात बहुभाषिक काव्यसंमेलन

सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ७ : साहित्यिक हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरीतून मांडावेत. जमिनीशी नाळ जोडणे म्हणजे कृतज्ञता होय. सामाजिक व राष्ट्रहित घडविण्याच्या दृष्टीने साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती करावी, असे आवाहन साहित्य अकादमीचे केंद्रीय कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र पाठक यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील भाषा मंडळ व नवी दिल्ली येथील साहित्य अकादमीतर्फे देऊर खुर्द (ता. धुळे) येथे ग्रामलोक साहित्यिक उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे संचालक इंजि.कुणाल देवरे अध्यक्षस्थानी होते. शशिकांत घासकडबी, माजी प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील, नरेंद्र खैरनार, डॉ.सविता पटेल, प्रशांत बागूल, प्रवीण पवार, सुभाष अहिरे यांच्यासह देऊर खुर्द येथील ग्रामस्थ उपस्थित होते.




देऊर खुर्द (ता. साक्री) : येथे ग्रामलोक साहित्यिक उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. नरेंद्र पाठक, संस्थेचे संचालक इंजि. कुणाल देवरे आदी.

डॉ. पाठक म्हणाले, साहित्य अकादमी फक्त पुरस्कारापुरती मर्यादित नसून साहित्याचे वाचन, लेखन, एकूणच साहित्य चळवळ गाव-पाड्यापर्यंत पोहोचली पाहिजे. साहित्य अकादमीचा हा उद्देश असल्यामुळेच ग्रामलोक हा कार्यक्रम देऊर खुर्द या लहानशा खेड्यात घेण्यात आला. साहित्यप्रेमींना एकत्र आणणे हे अकादमीचे कार्य आहे. साहित्य, संस्कृती आणि भाषा हे विषय राजकारणाचे नाहीत. साहित्यिकांनी अभिव्यक्त झाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कुणाल देवरे यांनी साहित्य हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातून निर्मित होत असते. व्यक्तिमत्त्व घडविण्याची प्रक्रिया ही अंतर्मनातून निर्माण होते. साहित्यिकांचा अंतरात्मा शुद्ध असला तर उत्तम समाज निर्मितीचे कार्य साहित्यातून होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कवींनी मराठी कवितांचे वाचन केले. कवी इंजिनिअर कुणाल देवरे, प्रशांत बागूल, प्रवीण पवार, नरेंद्र खैरनार, सुभाष अहिरे, डॉ. सविता पाटील आदींनी कवितांचे सादरीकरण केले. प्रा. जगदीश वाघ यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी आभार मानले.

### 'खानदेश लोकधारा' कार्यक्रमाने रंगत

दुसऱ्या सत्रात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी खानदेश लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. खानदेशातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. तिसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे बहुभाषिक काव्य संमेलन झाले. नंदुरबार येथील शशिकांत घासकडबी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कवी, लेखक व भाषांतरकार माजी प्राचार्य डॉ.एस.आर.पाटील अध्यक्षस्थानी होते. देऊर खुर्दचे सरपंच पूनम देसले, उपसरपंच काशीनाथ माळी, पोलिसपाटील मनोज खोंडे, सुदाम देसले, रावसाहेब देसले, भटू साळवे, हंसराज देसले, अमर देसले, सतीश देसले, प्रेमसिंग गिरासे उपस्थित होते.

### निमंत्रित कवींचा गौरव

बहुभाषिक काव्य संमेलनाचे काव्य संचालन कवी रावसाहेब कुवर यांनी केले. याप्रसंगी त्रिशिला साळवे, प्रमिला मराठे, गुलाबराव मोरे, वेदराज कपाटे, दत्ता कल्याणकर, अशोक तोरवणे, आधार चव्हाण, दिलीप लोखंडे, रामदास धोंडगे, रोहित ठाकूर, नितीन अहिरराव आदी कवींनी स्वरचित कविता सादर केल्या. निमंत्रित कवींना मानवस्त्र व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. एस. आर. पाटील, प्राचार्य डॉ.संजीव गिरासे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. वाल्मिक आढावे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डॉ.मिलिंदकुमार देवरे, डॉ.विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी आभार मानले.